**CNR No.MHST120005962022**

## नियमित दिवाणी दावा क्र.–२०८/२०२२ मधील नि.१६ वरील आदेश

१.. सदरचा अर्ज हा प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी त्यांच्या विरूध्द पारित झालेला विना कैफियतीचा आदेश रद्दबातल होवून त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करून घेणेसाठी दाखल केलेला आहे.

२.. प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा त्यांच्या विरूध्द वाटपासाठी दाखल केलला आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांना दाव्यास कैफियत द्यावयाची होती परंतु त्यांना दाव्यासंदर्भातील महत्वाची कागदपत्रे व माहिती हाती न आल्यामुळे त्यांना विहित मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. म्हणून प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला विना कैफियतीचा आदेश रद्द करुन सदरची कैफियत दाखल करुन घ्यावी अशी विनंती केली आहे.

३.. वादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जास हरकत घेतली आहे व कथन केले आहे की, प्रतिवादी क.४ व ५ यांनी दाव्याचे कामकाज लांबविणेसाठी विलंबाने तसेच मुद्दामहून मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. त्यामुळे वादी यांनी सदरचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे. विकल्पेकरून अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी वादी यांना खर्चाची रक्कम देणेची विनंती केली आहे.

४.. प्रतिवादी व वादी विधिज्ञांचा युक्तीवाद व अभिलेखाचे अवलोकनावरुन असे निदर्शनास येते की वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द वाटपासाठी आदेशासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत

दावा हा युक्तीवादासाठी असताना प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना महत्वाची कागदपत्रे मिळू न शकल्याने व त्यांना दाव्याची माहिती न मिळाल्यामुळे त्यांच्या विरूध्द विना कैफियतीचा आदेश पारित झालेला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचा विचार करता प्रतिवादी क्र.४ व ५ यांना दाव्यास कैफियत देण्यास विलंब झाला असल्याचे दिसून येत आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला असल्याने व त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांना हक्क अधिकार प्राप्त होणार असल्याने दाव्याचा निर्णय गुणावगुणावर होणेसाठी प्रतिवादी क्र.४ व ५ यांची कैफियत अभिलेखावर घेणे व त्याकामी झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र.४ व ५ यांना झालेला विलंब माफ करुन त्यांची लेखी कैफियत दाखल करणेस परवानगी देणे हे न्यायाच्या दृष्टीकोनातून आवश्यक ठरणार आहे. सदरचा अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादी क्र.४ व ५ यांना सदर दाव्यात आपले म्हणणे दाखल करता येणार नाही व सदरचे प्रकरण कायम स्वरुपी निकाली निघणे कामी अडचण निर्माण होणार आहे. प्रतिवादी क्र.४ व ५ यांचेकडून झालेला उशीर हा त्यांना महत्वाची कागदपत्रे विहित मुदतीत मिळालेली नसल्याने सदरचा विलंब माफ होउन मिळणे आवश्यक ठरते. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुत नि.१६ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.४ व ५ यांचे विरुध्द नि.१ ला पारित झालेला विना कैफियत चालविणेबाबतचा झालेला आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र.४ व ५ यांची कैफियत अभिलेखावर घेणेत येत आहे.

*(खुल्या न्यायालयात न्यायसनावर घोषित करण्यात आला.)*

Rajiv Babasaheb Bahirwal

Digitally signed by Rajiv Babasaheb Bahirwal
Date: 2023.06.16 17:12:05 +0530

म्हसवड.

दि.१६.०६.२०२३

**( रा.बा.बहिरवाल )**
दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,म्हसवड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | J.A. Patel, Stenographer (Grade-3) |
| Name of Court | R. B. Bahirwal, Civil Judge, Jr. Div, Mhaswad. |
| Date of Dictation | 16.06.2023 |
| Order signed by the P.O. on | 16.06.2023 |
| Order uploaded on | 16.06.2023 |